०५/०८/२०२५ 1155 (20) नियोजन

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**चौथा मजला, मुख्य इमारत, मंत्रालय,**
**मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई - ४०० ०३२.**

**दूरध्वनी क्र ०२२-२२७९४१९६** **Email ID : ud13-urban@mah.gov.in**

---

**जा.क्र. टिपीएस-१८२०/१५०/प्र.क्र.११(भाग-२)/२०२०/नवि-१३** **दिनांक : ०३.०७.२०२५**

**प्रति,**

मा. महानगर आयुक्त,
पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे.

**विषय:- प्राथमिक नगर रचना योजना क्र.४ होळकरवाडी**
महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ८६ (१) अनुसार प्राथमिक नगर रचना परियोजना मंजूर करणेबाबत.

**संदर्भ:-** लवाद नगर रचना परियोजना होळकरवाडी क्र.४ यांचे शासनास पत्र क्र.२४४७/२०२३, दि.१४.०२.२०२३.

**महोदय,**

प्रस्तुत प्रकरणी संदर्भिय दि.१४.०२.२०२३ रोजीच्या पत्रान्वये प्राथमिक नगर रचना परियोजना क्र.४ होळकरवाडी ही परियोजना त्याकरीता नियुक्त लवाद यांनी आवश्यक वैधानिक कार्यवाही पार पाडून शासनास मंजूरीकरीता सादर केलेली आहे. सदर परियोजनेस काही सूचना/ अटींसह, शासनाने मंजूरी प्रदान केलेली आहे.

त्याअनुषंगाने खालील नमूद मुद्यांची पूर्तता होण्याकामी आवश्यक ती कार्यवाही नियोजन प्राधिकरण म्हणून आपल्या स्तरावरून करण्यात यावी.

i) सदर प्राथमिक नगर रचना योजनेच्या अनूषंगाने योजनेतील अंतिम भूखंडांची मोजणी करुन जागेवर भूखंडनिहाय सिमांकन (Demarcation) ची कार्यवाही पुर्ण करणे आवश्यक आहे.
ii) नियोजन प्राधिकरणाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियमाच्या कलम ६८अ(१) मधील तरतुदीच्या अनुषंगाने अभिप्रेत असलेली कार्यवाही तातडीने पुर्ण करण्यात यावी.
iii) प्रस्तुत नगर रचना योजनेतील मूळ भूखंड क्र. ७८ खालील जागा शासकीय मालकीची असून, या मूळ भूखंडात प्राधिकरणाकरिता अं. भू. क्र.२८५ निर्माण करणेत आला आहे. प्राधिकरणास सदर भूखंड भविष्यात विक्री करावयाचा झाल्यास, त्याकरिता शासनाची पूर्व परवानगी घेणे आवश्यक राहील.

**आपला,**
Pranah
**(प्रणव कर्पे)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत:-** १) मा. संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२) मा. सह संचालक, नगर रचना, पुणे विभाग, पुणे.
३) सहायक संचालक, नगर रचना, पुणे शाखा, पुणे.
४) निवडनस्ती/नवि-१३.

16

Scanned with OKEN Scanner